PVG's

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Unit Test I (2024-25)

## Standard - IX

**Subject - Marathi** **Marks - 20**
**Date - 8.8.2024** **Time - 8.15 a.m. to 9.30 a.m.**

**प्र. १ अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

अखेर मुहूर्ताचा दिवस जाहीर झाला. दिनांक १८ एप्रिल सन १८५३, सोमवार रोजी सायंकाळी ५ वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाली. पाना - फुलांचे हार, तोरणे, निशाणे लावून १० मोठे खोलीवजा डबे शृंगारलेले. इंजिनावर अंग्रेजांचे मोठे निशाण फडकत आहे. डब्यांत गादीच्या खुर्च्या, कोच यांवर रेल्वेचे सगळे डायरेक्टर, सर जमशेटजी जीजीभाई, नाना शंकरशेट आणि अनेक इतर नगरशेट जामानिमा करून बसलेले. बरोबर पाच वाजता आगगाडीने कूऽक शिटीचा कर्णा फुंकून आपल्या भकभक, फकफक प्रवासाला सुरुवात केली. मुंबई ते ठाणे दुतर्फा लाखांवर लोक कलियुगातला हा विंग्रेजी चमत्कार पाहायला आ वासून उभे होते. ना बैल, ना रेडा, ना घोडा आणि वाफेच्या जोरावर एक नाही, दोन नाही, दहा डब्यांची माळका खुशाल चालली आहे. झुकझुक करत लोखंडी रुळांवरून ! कमाल आहे बुवा या विंग्रेजांची ! आता तर काय ? विस्तव आणि पाणी यांची सांगड घालून विंग्रेजांनी वाफेलाच गाडी ओढायला लावले !

**अ. १ एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१) पहिली आगगाडी मुंबईहून कोणत्या दिवशी निघाली ?

२) आगगाडीने आपल्या प्रवासाला किती वाजता सुरुवात केली ?

**अ. २ स्वमत** **(२)**

तुमच्या मते रेल्वे प्रवासाचे असलेले फायदे, तोटे सविस्तर लिहा.

**प्र. १ ब) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**ब. १ आकृतिबंध पूर्ण करा** **(२)**

**स्टेजवर बसलेल्या शिरीषची वैशिष्ट्ये**

**अ-२ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१) तंबोऱ्याचा आवाज कसा होता ?

२) शिरीषने कोणत्या रागातली गत् वाजवली ?

मी शिरीषकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर धीटपणा व आत्मविश्वास पुरेपूर प्रतिबिंबित झाला होता; पण त्याचे हे अवसान फार वेळ राहणार नाही, हे मी ओळखून होतो. पडदा वर जाऊन बाहेरचा श्रोतृवृंद नजरेला पडताच त्याचा हा धीर सुटेल याची मला खात्री होती. शिरीषने खूण करताच मी पडदेवाल्याला इशारा केला आणि पडदा झरझर वर गेला. फूटलाईटचा झगझगीत प्रकाश डोळ्यांवर पडताच शिरीषने डोळे मिटून घेतले. त्या प्रकाशाची डोळ्यांना जराशी सवय झाल्यावर शिरीषला सबंध श्रोतृवृंद दिसला आणि त्याच क्षणी त्याच्या मनाची झालेली चलबिचल त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागली. तो गडबडून गेला आहे, हे मी ओळखले. त्याला आता सावरून धरणे, शिक्षक या नात्याने माझे कर्तव्य होते. मी तंबोरेवाल्याला व तबलेवाल्याला खूण केली. तंबोऱ्याचा धीरगंभीर आवाज घुमू लागला. शिरीषने डोळे मिटून कुणाचे तरी ध्यान केल्यासारखे दिसले व पुन्हा त्याचा चेहरा पूर्वीच्या आत्मविश्वासाने न्हाऊन निघाला व हलकेच त्याने 'षड्ज' लावला. एका दहा ते बारा वर्षांच्या मुलाने शांतपणे वाजवायला सुरुवात केलेली पाहून लोक शांत बसले. धीमेपणाने शिरीषने भूप रागातली गत् वाजवायला सुरुवात केली. तेच ते सूर! मात्रेचाही फरक नाही. तो शांतपणे वाजवू लागला आणि .. आजपर्यंत बसला नव्हता एवढा धक्का मला बसला! कानांवर विश्वास बसेना, नजरेवरही बसेना !

**प्र. २ अ) खालील अभंग वाचून दिलेली कृती करा.**

संतकृपा झाली ।
इमारत फळा आली ।।१।।

ज्ञानदेवें रचिला पाया ।
उभारिलें देवालया ।।२।।

नामा तयाचा किंकर ।
तेणें रचिलें तें आवार ।।३।।

जनार्दन एकनाथ ।
खांब दिधला भागवत ।।४।।

तुका झालेसे कळस ।
भजन करा सावकाश ।।५।।

बहिणी म्हणो फडकती ध्वजा ।
निरूपणा केलें बोजा ।।६।।

सकलसंतगाथा खंड दुसरा : श्री तुकाराममहाराजांची अभंगगाथा
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**अ) कंसातील पर्याय योग्य ठिकाणी लिहून आकृतिबंध पूर्ण करा.**

| वारकरी संप्रदायरूपी इमारती संबंधित संकल्पनाचा अर्थ स्पष्ट करा. | | |
|---|---|---|
| | → पाया रचणे | ☐ |
| | → आवार रचणे | ☐ |
| | → खांब होणे | ☐ |
| | → कळस चढवणे | ☐ |

(परिसर प्रचाराने व्यापक केला, परिपूर्ण वैभवापर्यंत पोहोचवला, वारकरी संप्रदायाची स्थापना, संप्रदायाला गुरुकृपेने बळकट केले.)

**ब) स्वमत** **(२)**

संतांचे कार्य नेहमीच मार्गदर्शक ठरते, या विषयी तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

**प्र. ३ टीपा लिहा. (कोणतेही २)** **(४)**

१) काझीरंगा अभयारण्याची भौगोलिक वैशिष्ट्ये
२) गेंड्याच्या सवयी
३) काझीरंगा अभयारण्याचे प्राणिजीवन

**प्र. ४ व्याकरण.**

**अ) सामान्यरूपे लिहा.** **(१)**

१) गवत २) हत्ती

**अ) अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.** **(१)**

मग मला आज कार्यक्रम दया.

**क) वचन बदला.** **(१)**

१) पत्ता २) ढग

**ड) वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणतेही १)** **(१)**

१) जिवाचे कान करणे
२) आटापिटा करणे



❖❖❖